मुख्य लेखा व वित्त विभाग पुणे
महानगरपालिका
जावक क्र. १५८४
दिनांक:- ५।७।१९

मा.सांख्यिकी व संगणक प्रमुख
सांख्यिकी व संगणक विभाग
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस सादर....

विषय:-महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६० अ नुसार विनिर्दिष्ट माहिती प्रकटीकरण.
संदर्भ:-आपलेकडील पत्र जा.क्र.एलओ/१५०७ दि.०४/०७/२०१९
(मुख्य लेखा व वित्त कार्यालयाकडील आ.क्र.२४६४ दि.०५/०७/२०१९)

संदर्भाकीत कार्यालय परिपत्रकानुसार विषयांकित प्रकरणी मुख्य लेखा व वित्त कार्यालयाशी संबंधीत माहिती खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | कलम ६०(अ)(३) | माहिती |
|---|---|---|
| १ | महानगरपालिकेचा तपशील | मुख्य लेखा व वित्त विभाग कार्यालय हे पुणे महानगरपालिकेचे एक स्वतंत्र खाते आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार अंदाजपत्रकीय कामकाज, मनपाचे लेखे ठेवणे अंतर्गत अर्थान्विक्षण, कोष व्यवस्थापन, प्राप्ती व चाचणीचे अर्थान्विक्षण, लेखा संकलन, सेवानिवृत्ती वेतन विषयक कामकाज, पूर:संचय निधी विषयक कामकाज, वेतन आयोग विषयक कामकाज असे कामकाजाचे सर्व साधारण स्वरूप आहे. |
| २ | महानगरपालिकेची कार्य पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी गठीत करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शवणारे विवरणपत्र - मग त्या मंडळाच्या परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत. | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही. |
| ३ | तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्याच्या निर्देशिका | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| ४ | महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा अधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| ५ | प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहीच्या लेखापरिक्षित ताळेबंद, जमा व खर्च, आणि पैशाचा ओघ दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्र | व्दिलेखा नोंद पद्धतीबाबतची कार्यवाही चालू आहे. माहे मार्च २०१९ नुकताच संपल्याने २०१८-१९ ताळेबंदाची कार्यवाही प्रगतीत आहे. उत्पन्नाचा स्त्रोत उत्पन्न जमा करणाऱ्या संबंधित खात्यांच्या संकेतस्थळावरून उपलब्ध होणे सोयीस्कर ठरेल. |

| | | |
|---|---|---|
| ६ | महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| ७ | सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्च आणि संवितरीत केलेल्या रकमांबाबत अहवाल | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| ८ | महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रित व निकष. | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| ९ | महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील. | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| १० | राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील, तसेच बांधकामाचे मूल्य, पुर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील याबाबतची माहिती, | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| ११ | महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींव्दारे मिळालेले उत्पन्न:- | |
| अ) | कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे, भाडे, लायसन्स व परवानगी यातून मिळणारी फी, | सन २०१८-१९ उत्पन्नाबाबत संबंधित खात्याकडून माहिती उपलब्ध होवू शकते. |
| ब) | वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन्स व परवानगी यातून मिळणारी फी, आणि वसुली न करण्यामागची कारणे | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| क) | राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने | वरील 'अ' प्रमाणे |
| ड) | महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा | मुख्य लेखा व वित्त कार्यालयास लागू नाही |
| इ) | जनतेकडून किंवा अशासकीय अधिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा | वरील 'अ' प्रमाणे |
| १२ | प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद | पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अंदाजपत्रक उपलब्ध आहे. |
| १३ | विहित करण्यात येईल अशी इतर माहिती | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ नुसार मुख्य लेखा व वित्त कार्यालयाकडील सेवक वर्गाची व तदनुषंगिक माहिती उपलब्ध होवू शकते. |

मा.स.कळावे,

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**पुणे महानगरपालिका**